Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, Pune, S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near e-Balbharti, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,
ई-बालभारती शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 Fax : 25665807 &
Email : secretary.stateboard@gmail.com

परिपत्रक

संदर्भ :– १) राज्यमंडळ पत्र क्र.रा.मं/भांडार–५/१९५१, दिनांक ०८/०५/२०२६
२) राज्यमंडळ पत्र क्र.रा.मं/भांडार–५/२०७७, दिनांक १५/०५/२०२६
३) विझडम एज्युकेशन, पुणे यांचे दिनांक १५/०५/२०२६ रोजीचे मेल.
४) राज्यमंडळ पत्र क्र.रा.मं/भांडार–५/२२४८, दिनांक २७/०५/२०२६
५) विझडम एज्युकेशन, पुणे यांचे दिनांक २७/०५/२०२६ रोजीचे मेल.

सन २०२६ मधील माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेसाठी स्कुल/कॉलेज रजिस्टर छपाई व पुरवठा करणेबाबत संदर्भ क्र. १ वरिल पत्रानुसार दरपत्रके मागविण्यात आले होते. विहित मुदतीत ५ दरपत्रके प्राप्त झाली असून त्यामध्ये न्युनतम दरधारक विझडम एज्युकेशन, पुणे यांना संदर्भ क्र. २ नुसार सुरक्षा ठेव जमा करणे, करारनामा करणेबाबत कळविण्यात आले होते.

संदर्भ क्र. ३ वरिल मेल व्दारे विझडम एज्युकेशन, पुणे यांनी वाहतूकीसाठी वेळ अपुरा पडत असल्यामुळे आम्हाला आमचे सादर केलेले दरपत्रक मागे घ्यावयाचे आहे असे कळविले होते. परंतू संदर्भिय पत्रामध्ये सदर दरपत्रकधारकांने कार्यादेश दिल्यापासून ७ दिवसामध्ये साहित्य छपाई करुन ९ विभागीय मंडळाला पुरवठा करणे आवश्यक आहे असे स्पष्ट नमूद केले होते. संदर्भ क्र.४ वरिल पत्रानुसार विझडम एज्युकेशन, पुणे यांना उपरोक्त बाबत खुलासा मागविण्यात आला होता. त्यास अनुसरुन विझडम एज्युकेशन, पुणे यांनी संदर्भ क्र. ५ वरिल मेल व्दारे खुलासा सादर केला आहे.

तथापि सदर खुलासा असमाधानकारक असून विझडम एज्युकेशन, ४८१, गुरुवार पेठ, पुणे – ४११०४२ यांनी काम करण्यास नकार दिल्यामुळे मंडळाचा वेळ वाया गेला. तसेच मंडळाला अडचणीमध्ये आणण्याचे काम केले आहे. मंडळाचे काम हे विद्यार्थी पालक व शिक्षक यांच्याशी सबंधित असल्यामुळे वेळेत काम होणे आवश्यक होते. तथापि सबंधितांनी काम करण्यास असमर्थता दाखविल्याने काम करण्यास विलंब झाल्याने त्यांना १ वर्षासाठी Blacklist करण्यात येत आहे.

क्र.रा.मं/भांडार–५/2724
दिनांक :–24/०६/२०२६

सचिव
राज्यमंडळ, पुणे

प्रत माहितीस्तव – १) मा. आयुक्त शालेय शिक्षण विभाग, पुणे.
२) सर्व विभागीय मंडळे.